आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२४ एप्रिल २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार थंडावला, शुक्रवारी मतदान

- निवडणूक काळात राज्यात आतापर्यंत ४७१ कोटी रुपयांहून अधिक रकमेची मालमत्ता जप्त, मद्य जप्तीचं प्रमाण गेल्यावेळेपेक्षा पावणे ३ पट जास्त

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश विकसित होत असल्याचं केंद्रीय मंत्री अमित शहा यांचं अमरावतीच्या प्रचार सभेत प्रतिपादन, तर मोदी यांच्या आर्थिक धोरणांवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांची टीका

- देशात हुकूमशाही विरोधात लाट, तसंच शेतकऱ्यांमध्येही केंद्र सरकारविरुद्ध असंतोष निर्माण झाला असल्याचा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा दावा

**आणि**

- ऑनलाइन किंवा मोबाइल बँकिंगच्या माध्यमातून नवे ग्राहक न जोडण्याचे कोटक महिंद्रा बँकेला रिझर्व्ह बँकेचे आदेश

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संध्याकाळी थंडावला. प्रचार सभा, मिरवणुक, बैठका,रोड शोचा धडाका थांबला असून आता मतदारांच्या गाठीभेटी आणि घरोघरी जाऊन शांततेत प्रचार करण्यावर उमेदवार आणि पक्षांचा भर राहील.

केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी आज **अमरावती** इथं प्रचार सभा घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश विकसित होत असल्याचं प्रतिपादन त्यांनी या सभेत केलं. भाजपा देशाचं संविधान बदलणार, आरक्षण संपवणार, अशा अफवा काँग्रेस पसरवत आहे, मात्र भाजपानं बहुमताचा उपयोग कलम ३७०, त्रिवार तलाक रद्द करण्यासाठी केला, असं त्यांनी सांगितलं. शरद पवार कृषी मंत्री असताना त्यांनी कुठलेही मोठे बदल कृषी क्षेत्रात केले नाहीत, अशी टीका अमित शहा यांनी यावेळी केली.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, राज्यसभा खासदार डॉक्टर अनिल बोंडे, आमदार रवी राणा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज अमरावती लोकसभा मतदारसंघात परतवाडा इथं प्रचारसभा घेतली. देशात, बेरोजगारीची समस्या सध्या अत्यंत तीव्र झाली असून, युवकांना नोकरीसाठी प्रचंड धडपड करावी लागत आहे. इंडिया आघाडीचं सरकार आलं तर पदवीधर आणि पदवीकाधारक विद्यार्थ्यांना सरकारी आणि खासगी क्षेत्रात अप्रेंटिशिप अर्थात शिकाऊ उमेदवार म्हणून काम करण्याचा अधिकार मिळेल, तसंच त्यांच्या बँक खात्यात दरवर्षी १ लाख रुपये जमा केले जातील, असं ते यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक धोरणांवर त्यांनी कडाडून टीका केली. इंडिया आघाडीला सत्ता मिळाली, तर गरीब शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं जाईल, जातनिहाय जनगणना केली जाईल, अशी आश्वासनं त्यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज **हिंगोली** लोकसभा मतदारसंघात वसमत इथं प्रचारसभा घेतली. गेल्या दहा वर्षात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाच्या

करिश्म्यामुळे जगात देशाची मान उंचावली आहे, असं ते म्हणाले. या दहा वर्षात फक्त चुणूक दिसली, आगामी काळात आणखी प्रभाव दिसणार आहे, विकासाची गंगा वाहणार आहे. त्यामुळे मोदी यांचे हात बळकट करा, असं आवाहन त्यांनी या सभेत केलं.

**वाशीम-यवतमाळ** लोकसभा मतदारसंघात वाशिम इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रोड शो केला. यावेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी भव्य बाईक रॅली काढून प्रचार केला.

**यवतमाळ** वाशिम लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही आज पुसद इथं प्रचारसभा घेतली. सभा सुरु असतानाच भोवळ येऊन ते कोसळले, कार्यकर्त्यांनी त्यांना सावरत मंचावरून उचलून नेलं आणि तातडीनं त्यांच्यावर डॉक्टरांनी उपचार केले. त्यानंतर त्यांनी पुन्हा भाषण केलं. या सभेनंतर ते वरुडला प्रचारासाठी रवाना झाले.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज **नांदेड** जिल्ह्यात भोकर इथं बातमीदारांशी संवाद साधला. देशात लोकशाही वाचवण्यासाठी सर्व घटक एकत्रित आले आहेत. देशात संविधान बदलाची भीती निर्माण झाली आहे. एकूणच देशात हुकूमशाही विरोधात लाट निर्माण झाली आहे, शेतकऱ्यांमध्येही केंद्र सरकारविरुद्ध असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यात महाविकास आघाडी तर देशात इंडिया आघाडीला यश मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. उद्धव ठाकरे यांनी हिंगोली लोकसभा मतदारसंघातल्या महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठी प्रचार सभा झाली. शिवसेना जशी उपऱ्यांचा नावे केली, त्याचप्रमाणे आपला सातबाराही इतरांच्या नावे करतील की काय अशी भीती शेतकऱ्यांच्या मनात  निर्माण झाली असल्याची टीका त्यांनी या सभेत केली.

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी आज **अमरावती** शहरात प्रचार सभा घेतली. देशात दडपशाहीचे राजकारण सुरू आहे, त्यामुळे शेतकरी, शेतमजूर अपंगाच्या सर्वांगीण विकासाकरता आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपला पक्ष निवडणूक लढवत आहे, असं त्यांनी यावेळी त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ जागांसह देशातल्या एकूण ८९ जागांवर शुक्रवारी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

विद्यमान खासदार प्रतापराव जाधव, नवनीत राणा, रामदास तडस, प्रतापराव पाटील-चिखलीकर, संजय जाधव यांच्यासह प्रकाश आंबेडकर, महादेव जानकर असे अनेक महत्त्वाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहे. या टप्प्यात एकूण २०४ उमेदवार रिंगणात आहेत.

दुसऱ्या टप्प्यातल्या मतदारसंघात एकूण १६ हजार ५८९ मतदान केंद्र आहेत. अमरावती, हिंगोली आणि परभणीत ३० पेक्षा अधिक उमेदवार रिंगणात आहेत, त्यामुळे याठिकाणी प्रत्येकी ३ बॅलेट युनिट, अकोल्यात १ आणि उर्वरित मतदारसंघात प्रत्येकी २ बॅलेट युनिट वापरली जाणार असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. १ कोटी ४९ लाखांपेक्षा जास्त मतदारांनी याठिकाणी नोंदणी केली असून १४ हजार ६१२ मतदारांनी गृह मतदानाचा पर्याय निवडला आहे.

**<><><><><>**

राज्यात आतापर्यंत निवडणूक विषयक यंत्रणांनी ४७१ कोटी ८९ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. त्यात २१६ कोटी ४७ लाख रुपयांचे तेराशे किलोहून अधिक अंमलीपदार्थ, सुमारे ३३० किलो सोनं-चांदी, ४३ कोटी ९६ लाख रुपये रोख यांचा समावेश आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी १६ लाख लिटरहून अधिक मद्य जप्त झालं होतं. यंदा ते प्रमाण पावणे ३ पट वाढून ४४ लाख लिटरपेक्षा जास्त झालं आहे.

आचारसंहिता भंगाच्या सी-व्हिजिल ॲपवर ३ हजार ३४५ तक्रारी राज्यातून नोंदवल्या गेल्या. त्यापैकी ३ हजार ३३७ तक्रारी निकाली काढल्या आहेत. मतदार यादीतल्या नोंदीविषयक २६ हजार ८१५ तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. त्यातल्या २६ हजार २६५ तक्रारी निकाली काढल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली.

**<><><><><>**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत आज रत्नागिरीत बुद्धिजीवी वर्गातल्या मान्यवरांची विशेष बैठक आयोजित केली होती. खासदार म्हणून रत्नागिरीच्या विकासाला वेग देण्याचं काम मी करण्याची ग्वाही राणे यांनी यावेळी दिली.

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी आज रत्नागिरीत वार्ताहर परिषद घेतली. भाजपला संविधान बदलायचं असल्याने '४०० पार'चा नारा दिला जात आहे, असा दावा राहुल गांधी करतात. परंतु, कॉँग्रेसनं आतापर्यंत ८० वेळा संविधान बदललं आहे,' अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

माहिती तंत्रज्ञान यंत्रणेतल्या त्रुटींमुळं ऑनलाइन किंवा मोबाइल बँकिंगच्या माध्यमातून नवे ग्राहक न जोडण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेनं कोटक महिंद्रा बँकेला दिले आहेत. नवे क्रेडिट कार्ड देण्यावरही रिझर्व्ह बँकेनं निर्बंध लादले आहेत. पुढील आदेशापर्यंत रिझर्व्ह बँकेचे हे निर्बंध कायम राहणार आहेत. विद्यमान बँक खातेधारक आणि क्रेडिट कार्ड धारकांना मात्र कोटक महिंद्रा बँक सेवा देऊ शकेल.

रिझर्व्ह बँकेनं सलग २ वर्ष कोटक महिंद्रा बँकेच्या माहिती तंत्रज्ञान विषयक पायाभूत सुविधांचं परीक्षण केलं आणि त्यात आढळून आलेल्या त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिले होते.

**<><><><><>**

**सांगली** जिल्ह्यातले ज्येष्ठ साहित्यिक वसंत केशव पाटील यांचं आज निधन झालं. ते ७८ वर्षाचे होते. १९९६ मध्ये त्यांच्या 'दशद्वार ते सोपान' या पुस्तकाला अनुवादासाठीचा ‘साहित्य अकादमीचा पुरस्कार’ मिळाला होता. 'कंदीलाचा उजेड' या कथासंग्रहाला ‘महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ:मय निर्मिती पुरस्कार’ मिळाला होता. कवी, गझलकार आणि प्रसिद्ध वक्ता म्हणून ते प्रसिद्ध होते, त्यासह दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या चिंतन, विविधा, साहित्य सौरभ अशा विविध कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला होता.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

उत्तर कोकणातल्या तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा अंदाज आहे. तर कोकणातल्या तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये मेघ गर्जनेसह हलका पाऊस पडेल. तर विदर्भात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह गारपीट आणि सोसाट्याचा वारा वाहील, आणि हलका पाऊस पडेल, असा अंदाज कुलाबा वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**